आज़ादी का
अमृत महोत्सव

# वाचन संस्कृतीच्या संवर्धनात ग्रंथालयांची भूमिका

# The Role of Libraries in the Promotion of Reading Culture




प्रा. पी. एम. इंगळे
संपादक

| | | | |
|---|---|---|---|
| २५. | ग्रंथपालाची प्रगत समाजाच्या विकसनासाठी वाचन चळवळीतील भुमिका | डॉ. शीला गोडबोले - पाईकराव | १६२ |
| २६. | INFLIBNET जोपासते डिजिटल वाचन संस्कृती | गोपाळ दगडू सागर, गोविंद सूर्यभान घोगरे | १६६ |
| २७. | वाचन संस्कृती काळाची गरज | बोंबले राजू बालासाहेब | १७१ |
| २८. | वाचक आणि ग्रंथालय | संतोष मारोती चमकुरे | १७७ |
| २९. | वाचन संस्कृती जोपासण्यासाठी ग्रंथालयांचे उपक्रम | युवराज बी. अंधोरिकर, डॉ. अशोक कोलंबीकर | १८७ |
| ३०. | डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालयाचे पाच सिद्धांत | सुर्यवंशी कमलाकर आनंदराव | १९४ |
| ३१. | वाचन संस्कृती वाढीस लागण्यासाठी "ग्रंथालयाची भूमिका" | गादेकर पी. सी. | २०१ |
| ३२. | वाचन संस्कृती, फायदे आणि २१ व्या शतकात ग्रंथालयांची भूमिका | डॉ. तेलगाने किशन कोंडीबा | २०९ |
| ३३. | वाचन संस्कृती संवर्धनासाठी शरदचंद्र महाविद्यालय ग्रंथालयाचे योगदान | डॉ. भरत रमेशराव लोकलवार | २१४ |
| ३४. | वाचनसंस्कृती - काळाचीगरज | रायकर दुर्गा सुहास | २२० |
| ३५. | वाचन संस्कृती | डॉ. वाडकर धोंडीराम सयाजी | २२६ |
| ३६. | वाचन संस्कृती काळाची गरज | डॉ. सतीश गंगाराम ससाणे | १२९ |

# ग्रंथपालाची प्रगत समाजाच्या विकसनासाठी वाचन चळवळीतील भुमिका

## डॉ. शीला गोडबोले – पाईकराव

**प्रस्तावना:**

जगातील अत्यंत प्राचीन असणाऱ्या तीन संस्कृतीपैकी भारतिय संस्कृतीचा विकास हा मानवी उत्क्रांतीच्या महत्त्वाच्या टप्प्यातील महत्त्वाचा टप्पा आहे. मानव्य विकासात ज्ञानाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे व ज्ञानाच्या रक्षण, संवर्धन व प्रसारणासाठी लागणारे ज्ञान ग्रंथबद्ध करून समाज अधिक प्रगल्भ होण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. ग्रंथांना भारतिय समाजात प्राचीन काळापासूनच खूप महत्त्व आहे. तक्षशिला, नालंदा विद्यापीठे ही केवळ ज्ञान देणारी केंद्र नव्हती तर त्या ठिकाणी हजारो ग्रंथ संवर्धित व रक्षित करून ठेवण्यात आले होते. विविध विषयावरील ग्रंथाच्या माध्यमातून तत्कालिन अध्यापकांनी समाज अधिक शिक्षित व प्रगल्भ करण्याचा प्रयत्न केला. नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय अत्यंत वैभव संपन्न ग्रंथसाठा असणारे ग्रंथालय होते. ग्रंथालयातील ज्ञान साठा व त्यांचे जतन करणारी व्यवस्था तितकीच विकसित होती. ग्रंथालयाच्या ग्रंथसाठ्यत कोणते ग्रंथ असलेच पाहीजेत, कोणते ग्रंथ वाचकांपर्यत पोहचले पाहीजेत हे महत्त्वाचे कार्य ग्रंथपालच करू शकतात. त्यासाठी मुळात ग्रंथपाल हा ज्ञानोपासक, वाचनप्रिय, ज्ञानसंग्रहशील व सेवावर्ती स्वभावाचा असला पाहीजे असाच अलिखित नियम होता. ग्रंथपाल तेंव्हा ही व आजही केवळ ग्रंथ संग्रहच करतो, त्यांचे संवर्धन करतो असे नाही तर वाचकांच्या पर्यायाने समाजाच्या गरजा लक्षात घेऊन तो ग्रंथ साठा समृद्ध करत असतो व हा ज्ञानसाठा वाचकांपर्यत कसा पोहचेल असे व्यवस्थापन निर्माण करतो.

**वाचन संस्कृतीचे महत्त्व:**

व्यक्ती, समाज पर्यायाने देशाच्या सर्वांगिण विकासासाठी ज्ञान हा खूप महत्त्वाचा घटक आहे. प्राचीन काळापासूनच 'ग्रंथ' हा सर्वात मोठा 'ज्ञान स्त्रोत' आहे. आजही ग्रंथाना पुर्वीपेक्षाही जास्त महत्त्व आहे. शिक्षण प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे ग्रंथ, पुस्तके त्याशिवाय शिक्षण प्रक्रिया पूर्ण होऊच शकत नाही. व्यक्तीच्या चौफेर विकासासाठी त्या व्यक्तीचा व्यक्तीमत्त्व विकास, वैचारिक विकास, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय विकास

घडून आणण्यासाठी ग्रंथ हे अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावत असतात जे शिक्षणाच्या पूर्णत्त्वासाठी आवश्यक मानले जातात. एखाद्या देशाचा भौतिक विकास म्हणजेच संपूर्ण मानव्य विकास असे समजतासेत नाही. आदर्श समाज रचनेसाठी अभिप्रेत सामाजिक मुल्ये विकसित करणे व ती समाजात रूजविणे हे शिक्षणाचे म्हणजेच वाचन संस्कृतिचे उद्दिष्ट असते. त्या त्या देशातील त्या समाजासाठीची आवश्यक सामाजिक मुल्ये रूजविण्याचे व समाजाचे उन्नयन घडवून आणण्याचे कार्य शिक्षण व्यवस्थेच्या माध्यमातून ज्ञान प्रक्रिये द्वारा ग्रंथ करीत असतात. ग्रंथालये समृद्ध असलीच पाहीजेत पण त्या सोबतच त्या ग्रंथाचा उपयोग प्रत्येक वाचकाला झाला पाहीजे. ग्रंथ साठा करून समाजाचा विकास होणार नाही तर प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक भेटलाच पाहीजे. त्यासाठीच ग्रंथपालाची वाचन संस्कृती संवर्धनामध्ये अत्यंत महत्त्वाची भुमिका असते. ग्रंथपाल, विद्यार्थी, शिक्षक व वाचकांच्या गरजा तसेच अभिरूची लक्षात घेऊन ग्रंथ संग्रह करतो त्यामुळे शिक्षण पद्धती अधिक विकसित होते.

**कोरोना (Covid-19) काळातील वाचनस्थिती व ग्रंथपालाची भुमिका:**

मगील दोन वर्षापासून संपूर्ण जग कोरोना महामारीला सामोरे जात आहे. त्यामुळे लॉक डाऊनच्या स्थितीत जग पूर्ण बंदिस्त झाले असतांना ज्ञान संवर्धन व ज्ञानाच्या प्रसारणाला ही मोठ्य प्रमाणात खिळ बसली आहे. शाळा, कॉलेज, तसेच सार्वजनिक वाचनालये, संदर्भ ग्रंथालये, विविध संस्थात्मक ग्रंथालये दिर्घकाळ बंद असल्यामुळे शिक्षक, विद्यार्थी व इतर वाचक ऑनलाईन स्त्रोतांवर अवलंबून होते. त्यालाही मर्यादा आहेत. अशाही परिस्थितीत विद्यार्थी, शिक्षक व इतर वाचकांपर्यत पोहचण्यासाठी काही ग्रंथपालांनी काही अभिनव प्रयोग केले व ते बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले.

१. ऑन लाईन प्रश्न पत्रिका
२. डेटाबेसच्या माध्यमातून Resources उपलब्ध करून देणे.
३. ऑनलाईन वर्तमानपत्र सेवा
४. अधिक विद्यार्थी व वाचक असलेल्या परिसरात वाचन साहित्य उपलब्ध करून देणे व त्यासाठीची यंत्रणा उभारणे.
५. कोरोना रूग्णांसाठी परत न घेता येणारे वाचन साहित्य उपलब्ध करून देणे व त्यासंबंधीची यंत्रणा उभारणे.
६. कोरोना संदर्भातील अद्यायावत माहिती, स्थानिक स्थिती, जगभरातील स्थिती काळजी, उपचार यासंदर्भाने ऑनलाईन प्रसारण करणे.

७. कोरोनाच्या अनुषंगाने अधिकृत माहितीचे ऑनलाईन प्रसारण करून समाजात पसणाऱ्या अंधश्रद्धा, अवैद्यकिय उपचार पद्धती तसेच अफवांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्या वाचकांसाठी अद्यायवत अधिकृत माहितीचे ऑनलाईन प्रसारण करणे.
८. विद्यार्थी व संशोधकांना आवश्यक ऑनलाईन वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
९. प्रकासमवेत लिंकअप करून त्यांचे PDF स्वरूपातील ऑनलाईन वाचन साहित्य (त्यांच्या संमतीने) सामान्य वाचकांना उपलब्ध करून देणे.
१०. सामान्य वाचकांसाठी ऑनलाईन अधिकृत माहिति स्त्रोत उपलब्ध करून देणे.

**कोरोना रूग्णांसाठी वाचन साहित्य:**

कोरोना आजार झाल्यानंतर त्याव्यक्तीची शारिरीक व मानसिक स्थिती खालावते. रूग्ण हॉस्पिटलमध्ये भरती केल्यानंतर Covid-19 च्या वैद्यकीय नियमावलीनुसार त्या ठिकाणी कोणतीही बाहेरील व्यक्ती जावू शकत नाही. त्यामुळे घरचे व परिचित कोणतीही व्यक्ती त्या उपचार कालावधीत दृष्टीस न पडल्यामुळे तसेच What's App, You Tube, Facebook, Twitter या समाज माध्यमाच्या माध्यमातून पसरविलेल्या अनेक अंधश्रद्धा अफवांमुळे रूग्ण मानसिकरित्या खचून जातो. समाज माध्यमाच्या माध्यमातून पसरविण्यात येणाऱ्या अशासकीय व अनाधिकृत माहिती मुळे रूग्णाचे मानसिक स्वास्थ बिघडते व त्यानंतर शारिरीक स्वास्थ्यावर त्याचा झपाट्याने परिणाम होतो. अशा रूग्णांसाठी ग्रंथपाल ग्रंथालया मार्फत खालील प्रकारच्या दोन सेवा प्रदान करू शकतात.

१. परिसरातील Covid-19 उपचार केंद्रातील रूग्णांना ऑनलाईन अधिकृत आवश्यक माहिती पुरविणे.
२. Covid-19 उपचार केंद्रातील भरती रूग्णांना त्यांची वाचन साहित्याची आवड लक्षांत घेऊन वाचन साहित्य पुरविता येईल जे माघारी घेण्याची गरज पडणार नाही जसे वर्तमानपत्रे, मासिके, करमणूक मासिके व ठववोण

**समारोप:**

ग्रंथालयात विविध विषयावर विविध ग्रंथ उपलब्ध असतात. अभ्यासक्रमाची क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, माहिती व विषयनिहाय खंड, आपली माहिती व ज्ञानाची भुक भागवित असतातच याशिवाय सध्याच्या

स्पर्धात्मक युगाला सामोरे जाताना जाण्यासाठी स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आवश्यक वाचन साहित्य विविध स्वरूपात उपलब्ध असतात.ग्रंथपाल वाचन संस्कृती जपण्यासाठी व वृद्धीगतं करण्यासाठी विविध अंगानी कार्य करू शकतात. वाचकांमध्ये वाचनाची गोडी वाढविण्यासाठी ते विद्यार्थी व शिक्षकाव्यतिरिक्त इतर वाचकांमध्येही वाचनप्रेम वृद्धीगतं करू शकतात.

**संदर्भ:**


१. ग्रंथालय शास्त्र परिचय, गंगाधर र. पारखी, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणेपृष्ठ २८३, २००१.

२. प्रलेखन आणि माहितीशास्त्र, (सुधारित दुसरी आवृत्ती) रेवती नरगुंदे, रू. २००.

३. ग्रंथालय आणि सामाजिक विकास, रेवती नरगुंदे रू. १७५.

४. ग्रंथालय संदर्भ सेवा, प्रकाश करमरकर, रू. १००.

५. ग्रंथालय संदर्भ सेवा, राजेंद्र रमाकांत साखरे, रू. २००.


•••